लोकमत

जल जीवन मिशन : पाण्यासाठीची पायपीट थांबणार

# रोज ५५ लीटर शुद्ध पाणी प्रत्येक घराला मिळणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** जलजीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यात पाणीपुरवठ्याच्या ५७२ योजना असून, आतापर्यंत ११७ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. या योजनेतून रोज प्रती कुटुंब ५५ लीटर शुद्ध पाणी देण्याचे शासन परिपत्रकात नमूद आहे.

पाणीटंचाईवर मात करण्याचा प्रयत्न म्हणून जलजीवन मिशन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे प्रति व्यक्ती ५५ लीटरप्रमाणे पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी ५७२ नळयोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. या सर्व योजनांची अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता आणि प्रशासकीय मान्यता पूर्ण झाली आहे. सन २०२४ पर्यंत ५७२ योजनांचा कृती आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यात सन २०२१ पासून जलजीवन मिशनला सुरुवात झाली असून, आतापर्यंत ११७ नळयोजनांची कामे पूर्ण झाली आहेत.




## काय आहे जलजीवन मिशन?


ग्रामीण भागात प्रती कुटुंब प्रती दिवस ५५ लीटर शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाने जलजीवन मिशन अंमलात आणले आहे. या मिशनअंतर्गत जिल्ह्यात ५७२ योजना पूर्ण केल्या जाणार आहेत.

## ५७२ पैकी ११७ योजना पूर्ण

जिल्ह्यात ५७२ नळयोजनेची कामे आहेत. यापैकी आतापर्यंत ११७ योजनेची कामे पूर्ण झाली आहेत. ७६ ते ९९ टक्क्यापर्यंत ६१ योजनांची कामे झाली आहेत.

## किती कामे झाली पूर्ण? (%)

५७२ : जिल्ह्यातील एकूण योजना




## तालुकानिहाय किती योजना पूर्ण?

| तालुका | योजना पूर्ण |
|---|---|
| कारंजा | ३२ |
| मालेगाव | १४ |
| मं.पीर | ३२ |
| मानोरा | १४ |
| रिसोड | ०९ |
| वाशिम | १६ |



## कारंजा तालुक्यात सर्वाधिक योजना?

१. कारंजा तालुक्यात सर्वाधिक ११४ नळयोजना असून, यापैकी ३२ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत.

२. मानोरा तालुक्यात सर्वात कमी ७४ नळयोजना आहेत. यापैकी १४ नळयोजनांची कामे पूर्ण झाली आहेत.

जिल्ह्यात जलजीवन मिशनअंतर्गत ५७२ नळयोजनांची कामे असून, आतापर्यंत ११७ योजनांची कामे पूर्ण झाली. उर्वरीत कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित कंत्राटदारांना दिलेल्या आहेत.

**- अजिंक्य वानखडे**, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जि.प. वाशिम